महाराष्ट्र शासन

# विभागीय शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail :11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०१९-२० प्रसिध्दी निवेदन दि.०४.०७.२०१९

********

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०३.२०१९ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. त्यानुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी ऑनलाईन केंद्रीय पहिल्या फेरीसाठी अर्जाचा भाग-१ व भाग-२ भरणे सुरु आहे.

आज दि.०४.०७.२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१९-२० साठी ऑनलाईन केंद्रीय पहिल्या फेरीसाठी विद्यार्थ्यांनी भाग-१ व भाग-२ चा अर्ज भरलेला आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे.

| एकूण प्रवेश क्षमता | भाग-१ नोंदणी केलेले अर्ज | ॲप्रुव्हड झालेले अर्ज | ॲटो ॲप्रुव्हड झालेले अर्ज | ॲप्रुव्हड न झालेले अर्ज |
|---|---|---|---|---|
| १०४१३९ | ८४८२४ | ५५८८४ | २४५६१ | ४३७९ |

दि.०४.०७.२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ४३७९ विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश अर्जाचा भाग-१ मार्गदर्शन केंद्रावरुन ॲप्रुव्हड घेतलेला नाही. सदरचे विद्यार्थी भाग-२ (पसंतीक्रम) न भरल्यास असे विद्यार्थी प्रवेश प्रक्रियाच्या पहिल्या फेरीस पात्र ठरलेले नाही.

दि. ०५.०७.२०१९ सायंकाळी ७ वाजता इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर होणार आहे, सदरची यादी फक्त सर्वसाधारण गुणवत्तेसाठी असून सदर माहिती मध्ये काही तफावत असल्यास विद्यार्थी व पालकांनी मार्गदर्शन केंद्रावर , विद्यालयात जाऊन हरकती / त्रुटी लेखी स्वरुपात सोबत दिलेल्या नमुन्यात दि.०६ व ८ जुलै २०१९ रोजी सकाळी ११.०० ते सायं.४.०० वाजेपर्यंत लेखी स्वरुपात अर्ज सादर करुन सोबत योग्य त्या पुराव्याच्या आधारे दुरुस्ती करुन घ्याव्यात. सर्वसाधारण गुणवत्ता यादीतील हरकती/त्रुटी दुरुस्ती नंतर दि.१२.०७.२०१९ सायंकाळी ६.०० वाजता इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१९-२० ची पहिली गुणवत्ता यादी जाहिर केली जाणार आहे.

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या **www.dydepune.com** व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या **http://pune.11thadmission.net** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

MRaut
(मिनाक्षी राऊत)
अध्यक्ष,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
प्र.शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

1st Round Press Note 03.07.2019



Scanned by CamScanner